Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Changing Religious Movements in Pre-Medieval Indian History

17-18 January 2020 Special Issue - 101 Vol. II

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editors
Dr. B. G. Gaikwad
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

Co-Editor
Dr. Balasaheb Shankarrao Kshirsagar
Head, Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

Co-Editor
Dr. Sandeep G. Londhe
Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) - 7.139 | Special Issue - 101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewerd

# मध्ययुगाच्या जडन घडणीत भक्ती चळवळीचे योगदान

**प्रा.डॉ. वसंत व्यंकटराव कदम**
इतिहास विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय , हिमायतनगर जि. नांदेड

प्राचीन काळापासुन भारतीय समाज जीवनावर धर्माचा मोठा पगडा दिसून येतो मानवी जीवणात धर्माला अत्यंत महत्वाचे स्थान होते आणि आज सुध्दा आहे. धर्मावर भारतीय समाजची अढळ श्रध्द होती. दैनंदिन जीवनातील सर्व कामे व्यवहार आचरण धर्मनुसार करावे धर्म म्हणजे सर्वस्व असीच समाजाची रीत होती . धर्माशिवाय समाज ही संकल्पनाच संवत नाही. अगदी जंगलात राहनाऱ्या अदिवासी समाजापासुन ते विज्ञानाच्या क्षेत्रात प्रंचड प्रगती केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहयाने जीवन जगणाऱ्या प्रगत राष्ट्रातील समाज जीवना पर्यंत धर्माने आपला स्वत चा ठसा त्या त्या समाज जीवनावर उमटविवलेला दिसून येतो. मनुष्याचा जन्म या पृथ्वीतलावर होताच कोणत्या ना कोणत्या धर्मांचा कोणत्याना कोणत्या जातीचा ठसा त्याच्या पाठीसी मारला जातो, म्हणून असे म्हणता येईल की मानवी जीवन रुपी नाण्याच्या समाज आणि धर्म या दोन बाजू आहेत भारत देशात अनेक धार्मांचा विवध कालखंडात विविध परिस्थिती निरुप उदय आणि विकास झाला.

प्रस्तुत लेखात मध्ययुगाच्या जडन घडणीत भक्तीचळवळीचे योगदान या विषयी आभ्यास केलेला आहे. भातीय इतिहासात मध्ययुगाचा आरंभ मुस्लीमांच्या आक्रमाना पासुन किंवा भारतातील मस्लीमांच्या राजकीय सतेच्या स्थापणे पासून होतो असे अनेक तत्ववेत्यानी मानले आहे. इसविसनाच्या नवव्या शतकाच्या पुर्वाधा पासुन या देशावर मुस्लीमांच्या आक्रनास सुरूवात झाली मुहम्मद बीन कासीम,मुहम्मद गझनी ,मुहम्मद घोरी यांनी भारतावर केलेल्या आक्रमाणामुळे भातीयांचे केवळ राजकिय शोषनच झाले नाही, तर या आक्रमणांचा परीनाम भारतीयांच्या सामाजिक,धार्मिक,आर्थिक व सांस्कतीक जिवनावर खूप मोठया प्रमाणत झलेला दिसून येतो. तेराव्या शतकाच्या पूर्वाधात भारतात इस्लामी राजकिय सत्ता स्थापन झाली मुस्लीम राज्यकर्त्यांच्या आणि शासकर्तेच्या धोरणामुळे मुस्लीमेत्तर समाजावर खूप मोठा सामाजिक,धार्मिक आणि सांस्कृतीक परिरणाम झला. जसे की हिन्दू स्त्रीयांना मुस्लीमा कडून जबरदस्तीने पळवून नेण्याच्या घटनान मुळे हिन्दू आणि इतर धर्मातील मुलीचे विवाह बालपणीच लावण्याची प्रथा आणि परपंरा सुरू झाली मुस्लीम राज्यकर्त्यानी साम्राज्य विस्तारा दरम्यान पराभुत हिंदू राज्यकर्त्यांच्या नगरातील. प्रातातील आणि राजपरिरवारातील हजारो स्त्री, परूषांना पकडू न त्यांना गुलाम बनवून सुंदर स्त्रीयाना आपल्या जनानखाण्यात ठेवले तसेच प्रमुख सरदार व प्रांतअधिकाऱ्यानाभेटी व नजरने म्हणून दिल्या, तर पुरूषाना गुलाम बनवून बाजारात त्यांची विक्री केली जात होती. तसेच प्रारंभी मुस्लीम प्रशासनात हिन्दूना जानिव पूर्वक सामील करून घेतले जात नव्हेत हिन्दू कैद्याना जबरदस्तीने इस्लाम धर्माची दिक्षा दिली जात तसेच हिंदूची कत्तल करणे त्यांना पकडून सक्तीने मुसलमान बनण्यास भाग पाडणे या देशातील हिंदूची मंदिरे, देवळे व मुर्तिउदध्वस्त करणे यांच्या तीर्थयात्रा व उत्सवावर बधंने घालणे इत्यादी सरास प्रकार मुस्लीम राज्यकर्त्याकडून सुलतान शाहिच्या काळात केले जात होते. कारण त्यांचे धोरणच हिन्दू विरोधी होते, हिन्दू आणि मुस्लीमेत्तर धर्मियांना जाचक आणि अन्यायकारक जिझीया कर लावला जात असे या शिवाय इतरही कर द्यावे लागत होते. सुलतान शाहीच्या काळत म्हणजेच मध्ययुगात हिन्दूचे जीवन संस्कृती,धर्म, स्त्रीया आणि पैसा या पैकी काही ही सुरक्षीत नव्हते एवढेच नाहीतर आपल्याच मात्रभूमीत मुस्लीमेत्तर समाजास कफीर समजल्या जात तसेच यांना नागरीकत्वाचे आधिकार नाकारले गेले हिन्दूना मुस्लीमांच्या बरोबरीचे अधिकार नाकाराले गेले या सर्व परिस्थितीला या देशातील राजकिय अराजकत्ता हिन्दू समाज धर्म आणि स्वतःराज्यकर्ते जबाबदार होते असेच म्हणने सयुंक्तीक ठरेल कारण या देशातील अंतर्गत राजकिय शत्रुता,द्वेश,अंहकार,अहमभाव, अत्मसंतुष्ठता व सता राज्यकर्त्याच्या स्वार्थामुळे राज्यकर्ते दुंभगले तसेच वर्णव्यवस्था,असपृश्यता, तसेच परकिंटाण्या जातिभेदामुळे या देशातील समाज दुभंगला एक मेकापासून मनाने दूर गेला, म्हणूनच वैभवशाली व धनसंपन्न असलेल्या भारत देशावर आक्रमण करण्यांची संधी परकिय मुस्लीम आक्रमकांना मीळाली आपल्या वर होणाऱ्या मुस्लीम आक्रमकांना भारतीय राज्यकर्ते तोंड देऊ शकले नाहीत. व मुस्लीम आक्रमकापासून आपल्या भुमीचे ते स्वंरक्षण करू शकले नाहीत आणि मुस्लीम आक्रमकाना परताऊन लाऊ शकले नाहीत मुस्लीम आक्रमकांच्या आणि राज्यकर्त्याच्या धोरणा पुढे येथील हिन्दू समाज पराभुत हतबल असहय अशा मणःस्थितीत गुलामी सदृषय जीवन जगण्याची वेळ मुस्लीमेत्तर समाजावर आली तरी पण इतक्या मनाने आणि राजकिय बाबतीत धुभंगलेल्या हिन्दूना आपला देश संस्कृती,ज्ञान आणि येथील धर्म सर्वश्रेष्ट आहे, असेच वाटत होते. परकीय लोक आपल्यापेक्षा श्रेष्ट असू शकतात हे भारतीयांनीला लक्षात घेतले नाही. आपल्यावर प्रभुत्व स्थापण करणाऱ्या मुस्लीमांचा धर्म आणि त्यांची संस्कृती यांचे नेमे स्वरूप व सामर्थ्य म्हणजे त्यांची संघटीत समाजण्यवस्था होय. मुस्लीमाचे धर्म प्रेम त्यांची शस्त्रात्रे इत्यादींचा अभ्यास हिंदू राज्यकर्त्यांनी कधीही केला नाही हें भक्तीचळवळी तील संतननी हिंदू राज्यकर्त्यांच्या व समाजाच्या लक्षात आणून दिले. या उलट हिंदू धर्म मार्तंडाच्या वर्चस्वामुळे मुळ हिंदू धर्मात कर्मकांड आणि अनिष्ट प्रथांचा अतिरेकी झाला आणि स्वतःला पुरोहित, धर्मगुरू माननाऱ्या वर्गाने राज्यकर्त्यांचे कानभरवून चुकीच्या हिंदू धर्म तत्वज्ञानाचे पुरावे देऊन हिंदू धर्म टिकविण्यासाठी जाती,रूढी,सामाजिक निती,नियम आणि कर्मकांड अधिकच कडक व जठील बनविले, त्यामुळे सर्वसामान्य बहुजन समाज दिशाहीन झाला मुस्लीम शासकांच्या हिंदू विरोधी धोरणामुळे धार्मिक,सामाजिक व सांस्कृतिक आव्हान हिंदू समाजासमोर उभे राहीले अशा परिस्थित दिशाहीन आणि असाहय झलेल्या मुस्लीमेत्तर समाजाला योग्य दिशा, व जिवन जगण्यासाठी स्पूति देण्याचे महानकार्य तत्कालीन साधूसंतानी भक्ती चळवळीच्या माध्यमातून केले

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue - 101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewerd

**भारतात भक्तीचळवळीचा उदय आणि विकास :-**

भारतात भक्ती परपंरा फार प्राचिन काळापासून चालत आलेली दिसून येते सिंधूसस्कृतीच्या काळात तत्कालीन समाज पशुपती म्हणजे शिवभक्ती करीत होता महाभारत काळातील भगवतगीतमध्ये भक्तीवर आधिक भर दिला आहे. पुढे मोर्य,गुप्त,वाकाटक, आणि राजपुत काळतही विविध देवतांच्या भक्तीची परपंरा कायमच होती. गुजराथ मधील जागतिक किर्तीचे सोमनाथ मंदिर आणि या मंदिरावर मुहम्मद गझ्नी ने केलेली सोळावी स्वारी सर्व परीचित आहे. यावरून राजपुत काळात देखील शिवभक्ती सूरू होती, हिंदू धर्मातील प्रत्येक व्यक्ती मोक्ष प्राप्तीसाठी प्रयत्न करीत असतो परमेश्वराची भक्ती करून मोक्ष प्राप्ती करता येत असल्याचे मुळे हिंदू धर्मग्रंथात सांगीतले आहे. परंतू मध्ययुगीन समाजातील ब्राम्हणांच्या व पुरोहीतांच्या धार्मिक क्षेत्रीतील वर्चेस्वामुळे कर्मकांडाचा अतिरेक झाला होता. अनेक धार्मिक विधी, अंधश्रधा, आणि बुवाबाजीचा प्रभाव समाजावर निर्माण केल्या गेला.हिंदू धर्मामध्ये परमेश्ववराच्या भक्ती पेक्षा इतर अवडंबर सनातनी धर्ममार्तडांनी अधिक महत्वपुर्ण बनवीले. त्यामुळे हिंदू समाज भरकटल्या गेला त्याच बरोबर या काळात मुस्लीमांचे फार मोठे संकट भारतीय समाजा समोर उभे राहीले मुस्लीम समाज आणि राज्यकर्त्यांची प्रेरणा त्यांचा धर्म होता व त्यांचे उदिष्ट्ये भारत देशाला इस्लाममय करणे हे होते. मुस्लीम समाजामण्यामध्य असलेला संघठीत पणा त्यांच्यात असलेला बंधुभाव व समानता, एकेश्वरवाद यांचा ही प्राभाव हिंदू समाजातील अनेकावर पडला होता. हिंदू समाजातील वर्णव्यवस्था जाती - जाती मधील भेक्ष - कनिरष्ठता आणि अस्पृश्यते सारख्या अत्यंत विघातक चालीरीतीमुळे हिंदू समाज दिशा हीन होऊन अधोगती कडे जाऊलागला त्याच बरोबर मुस्लीम राज्यकर्त्यांनी हिंदू च्या धार्मिक व सांस्कृतिक समाजजिवनावर अनेक बंधने घातली होती. त्यांनी मुस्लीमेत्तर धार्मिया ची मंदिरे,प्राथना स्थळे,विहारे उध्वस्थ केली तसेच इतर धार्मियावर जिझिया कर लावला धार्मिक उत्सव व सनसमारंभावर निर्बंध घातले यामुळे मुस्लीमेत्तर समाज प्रामुख्याने हिंदू समाज धोक्यात आला, म्हणूनच मध्ययुगीन कालखंडातील भक्तीचळवळीतील संतानी भक्तीचळवळिच्या माध्यमतून हिंदू समाजाला जीवण जगण्याची प्रेरणा दिली,जीवन जगण्याची एक नवी दिशा व मुलमंत्र दिला त्यामुळेच हिंदू समाजाला जगण्यासाठी स्पुर्ती मिळाली...

भक्ती चळवळीलील संतांनी कार्य करीत असतांना हिंदू धर्मातील अवडंबर कर्मकांड दुर करणे, पुरोहिताचे धर्मावरील वर्चेस्व कमी करणे, सामान्यमानसाला परमेश्वराची प्राप्ती सहजपणे करता येईल, भक्ती करता येईल असा भक्तीमार्ग सांगणे आणि मुख्य म्हणजे जातीभेद व सामाजिक विषयता दुरकरून सामाजात समता प्रस्तापित करण्याचा कार्यक्रम हाती घेतला मुस्लीम राज्यकर्त्यानी हिंदू धार्मियांना आपल्या धार्मप्रमाणे जाहीर अचरण करण्यावर बंधने घातल्या मुळे भक्तीचळवळीत संतांनी असा मार्ग सांगीतल की, परमेश्वर हा मंदिरात व इतरत्र नसून तो आपल्या सर्वांच्या अंतकरनात आहे. त्याचीच भक्ती करा असा सोपा संदेश संतानी दिलां याच काळात स्वतःच्या आदर्श व पवीत्र चारित्र्यातून भक्ती मार्गाच्या साधू संतानी असाहय व भरकटलेल्या नेत्रत्व हीन हिंदू समाजाला नेत्रत्व दिले परीणामी या चळवळीत सर्व स्तरातून संत निर्माण झाले. ब्राम्हण किंवा पुरोहीत यांच्या ऐवजी विविध चेष्ठ-कनिष्ठ जातीतून उदयास आलेल्या भक्ती चळवळीतील संताना समाजाने आदर देवून त्यांचे हिंदू धर्माची पताका त्यांची हाती दिला आणि त्यांचे नेत्रत्व स्विकारले या भक्तीमार्गानेही इस्लाम धर्माप्रमाणे ऐकेश्वर वादाचा पुरस्कार केला यातील काही संतानी सगुन तर काही संतानी निर्गुण भक्तीचा पुरस्कार केला, भक्तीचळवळीत संतानी सामान्य माणसाला, बहुजन समाजाला पलायनवाद शिकवीला या मुळे तत्कालीन काही सनातानी पंथीयानी भक्तीचळवळीतील संतावर टीका केल्या काहीनी यांना टाळकुठे असे ही म्हटले परंतू तत्कालिलन परिस्थिती पाहता या आरोपात फारसे तथ्य दिसून येत नाही. कारण मुस्लीम राजवटीच्या काळात त्यांच्या कडून पराभव पत्कारल्या नंतर सामान्य माणसाला हिंदू धर्मासी निघडीत ठेवण्याचा हा एकच मार्ग होता.

**भक्तीचळवळ :-**

मानव समाजाचा अभ्यास करता असे स्पष्ट होते की, या देशात अतिप्राचीन काळा पासून मानवाने विविध रूपात ईश्वर भक्ती सूरू केली म्हणून भक्ती चळवळीचा उदय हा अतिप्राचीन काळातच झाला असे म्हणावे लागते मानवाचे अंतिम ध्येय हे मोक्ष प्राप्ती करणे हे आहे. हे मोक्ष प्राप्त करण्यासाठी मानवास ज्ञानमार्ग,कर्ममार्ग आणि भक्ती मार्ग असे तीन मार्ग सांगीतले आहेत या पैकी आली भक्ती मार्ग हा आणि भक्तीमार्गाचा पुरस्कार मध्ययुगीन संतानी केला त्यामुळे भक्ती चळवळ उदयास झाली हा मार्ग सुलतान शाहीच्या कालखंडात सामान्य मानसाला सहजपणे आचरणात आनता येण्यासारख होता चिंतन नामस्मरण आणि सत्तकृत्ये या द्वारे परमेश्ववराची भक्ती केली जाऊ शकत होती. ईश्वर प्राप्त करण्याच्या तीन मार्गा पैकी दुसरा मार्ग म्हणजे ज्ञान मार्ग होय, हा मार्ग अवघड आणि कठी मानला जातो (अंतिम व शाश्वत सत्याचे ज्ञान होणे हा ज्ञानमार्ग होय) तसेच तीसरा मार्ग म्हणजे कर्ममार्ग कोनत्याही फळाची अपेक्षा न करता निस्वार्थ व निरपेक्ष भावनेने कर्म करीत जाणे हा कर्ममार्ग होय मध्ययूगीन कालखंडात मुस्लीम राजवटीच्या काळात हेदोन्ही मार्ग कठीन होते भक्ती मार्ग हा संसारात आणि व्यवसायात राहून सुध्दा आचरणात आनणे शक्य होत. भक्तीमार्गातील संत हे समाजातील विविध श्रेष्ठ व कनिष्ठ जाती जमातील होते आणि हे सर्वसंत व्यवसायीक होते त्यामुळे तत्कालीन समाजात भक्ती चळवळीचा प्रसार मोठया प्रमाणात झाला. समाजातील सर्व जाती धर्माच्या लोकाना ईश्वरप्राप्ती साठी किंवा मोक्ष प्राप्तीसाठी एक नवा भक्तीमार्ग भक्तीचळवळीच्या माध्यमातून सापडला हिंदू धर्मातील पुरोहित वर्ग आपल्या स्वार्थासाठी सामाजाच्या व्यापक हिताकडे दुर्लक्ष करतो पुरोहिताच्या रूपाने असलेला अडथहा भक्ती संतानी बाजुला सारला, इतकेच नाही तर हिंदू धर्माचे प्राचिन मुळ धार्मिक वाङःमय जे संस्कृत भाषेत होत ते या संतानी प्रादेशीक भाषेत आनले आपल्या मात्र भाषेत संतसाहीत्याची रचना झाल्यामुळे सर्वसामाण्य बहूजन समाजापर्यंत हिंदू धर्म तत्वज्ञान जावून पोहचू शकले उदा. असे सांगता येईल की ,संत ज्ञानेश्वरानी गीतेचा सार मराठीत ज्ञानेश्ववरीच्या रूपाने लिहीला. भक्ती चळवळीतील संत विविध जातीतील होते कोणी विनकर कोणी चांभार कोणी कुंभार कोणी नाव्ही तर कोणी फकीर होते परंतू त्यांचा व्यवसाय त्यांच्या भक्तीच्या आड आला नाही किंवा

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue - 101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewerd

धर्मांच्या आड आला नाही कुठल्याही धर्मांचा,पंथाचा,वर्णाचा,जातीचा व आर्थिक स्थितीचा भेद मानात न बाळगता, मनवता हा एकच धर्म मानुन पृथ्वीवरील सर्व मानव जातीना समान मानावे असे भक्ती चळवळीतील संतानी सांगीतले व तसे आचरणात ही आनेल.

**सारांश :-**

या देशात समाज प्रबोधचाची मुहूर्तमेड खऱ्या आर्थाने भक्तीचळवळीतील संतानी रोवली असेही म्हणता येईल कारण सर्व मानव जाती बद्दल बंधूभाव, जाती भेदाला विरोध सामाजिक समतेवर श्रध्दा ही त्यांची शिकवन होती सर्व मानसे एकाच परमेश्र्ववराची लेकरे आहेत त्यामूळे त्यांनी जाती-जीतीतील श्रेष्ठ-कनिष्ठता किंवा धर्म भेद न बाळगता परस्परावर प्रेमकेले पाहिजे असे भक्ती चळवळीच्या संताचे मत होते.माणसावर प्रेम करणे त्यांची सेवा करणे हीच खरी ईश्र्वर सेवा आणि झाली ईश्र्वर भक्ती आहे. असे ही संतानी सांगीतले. भक्ती चळवळीतूनच जनसेवा हीच ईश्र्वर सेवा हा विचार पुढे आला. परमेश्र्वराला प्राप्त करण्यासाठी किंवा मोक्ष प्राप्त करण्यासाठी जातीचा अडसर असू शकत नाही ईश्र्वराची भक्ती करण्याचा अधिकार पृथ्वीतलावरील सर्व मानवजाती चा आहे असे सांगुन भक्ती चळावळीत संतानी ऐकेश्र्वर वादाचा पुरस्कार केला तसेच या संतानी हिंदू धर्मातील पुरोहिताचे, ब्राम्हणांचे व धर्मार्तडांचे वर्चस्व नाकारले ईश्र्वर आणि मानव यांच्यात कोणत्याही मध्यस्थीची ती किंवा दलालाची गरज नाही असे सांगुन सामाजिक समता प्रस्था करून हिंदू धर्मातील सर्व समाजाला एका सुत्रात गुफले म्हणून असे म्हणता येईल की, मध्ययुगाच्या जडणघडणीत भक्तीचळवळीचा अत्यंत मोलाचा वाटा असल्याचे अभ्यासा अंती स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. डॉ. आचार्य धनंजय,(जुलै २००८) मध्यकालिन भारत, नागपुर श्री. साईनाथ प्रकाशन
२. वर्मा हरिश्चंद्र., (संपा), १९८३ मध्यकालिन भारत, दिल्ली हिंदी माध्यम कार्यन्वय निदेशालय,दिल्ली विश्व विद्यालय.
३. डॉ. कठारे ए.एम., १ जानेवारी २०१३,मध्ययुगीन भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव.
४. डॉ. देशपांडे व.तु. २०११ मध्ययुगीन भारताचा इतिहास,नांदेड अभय प्रकाशन.
५. डॉ. केंद्रे के.सी. २०१५ मध्ययुगीन भारताचा इतिहास, लातून अरूना प्रकाशन.